अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा.पंतप्रधानांच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीमध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन पुरकपत्रक क्रमांक: अविवि- २०१९/प्र.क्र.६६/का.९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- १३ जुन, २०१९.

वाचा:-

१. शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग क्र. समिती-२०१६/प्र.क्र.६४/कार्या.९, दि.०५ जुलै,२०१६.
२. केंद्र शासनाच्या अतिरिक्त सचिव,अल्पसंख्याक कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे दि ०५, जुन,२०१८ चे पत्र

प्रस्तावना:-

अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सूचनानुसार अल्पसंख्याकांच्या कल्याणाकरिता मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ५ जुलै, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय अल्पसंख्यांक समितीचे गठण करण्यात आले आहे. सदर समितीमार्फत पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाचा आढावा घेणे व केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रम (MSDP) अंतर्गत प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेवुन सदर प्रस्तावाची क्रेंद्र शासनास शिफारस करणे हे समितीचे कामकाज आहे. तथापि, आता केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रम (MSDP) या योजनेची पुनर्रचना करुन, प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (PMJVK) या नावाने राबविण्याचा केंद्र शासनाने निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (PMJVK) बाबत केंद्र शासनाच्या दिनांक ५ जुन , २०१८ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये या कार्यक्रमांतर्गत प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभागाचे प्रधान सचिव, संबधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, राज्यातील अग्रणी बॅकेचे (लीडबॅक) प्रमुख, केंद्र शासन निर्धारित करतील असे लोकप्रतिनिधी यांचा सदस्यांमध्ये समावेश करुन राज्यस्तरीय अल्पसंख्याक समितीची स्थापना करण्यात यावी, अशा सूचना प्राप्त झाल्या आहेत. केंद्र शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमांतर्गत शासन निर्णय दिनांक ५ जुलै, २०१६ अन्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (PMJVK) या कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीचे सदस्य संबंधित जिल्हयांचे जिल्हाधिकारी व राज्यातील अग्रणी बॅकेचे (लीडबॅक) प्रमुख वगळता इतर सर्व सदस्यांचा समावेश आहे. सबब, राज्यस्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीमध्ये संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि राज्यातील अग्रीण बँकेचे प्रमुख यांचा सदस्य म्हणून समावेश करणे तसेच सदर समितीचे कार्यकक्षा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन पूरकपत्रक :-

अल्पसंख्याकाच्या कल्याणाकरिता मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय दि. ५ जुलै, २०१६ अन्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील गठीत राज्य अल्पसंख्याक कल्याण समितीच्या सदस्यांमध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यास तसेच सदर समितीची खालील प्रमाणे कार्यकक्षा वाढविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदस्य :-

१	संबंधित जिल्हयांचे जिल्हाधिकारी-	सदस्य
२	निमंत्रक, राज्यस्तरीय बॅकर्स समिती, बॅक ऑफ महाराष्ट्र - लोकमगल,शिवाजीनगर,पुणे	सदस्य

राज्यस्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीचे कार्य:-

प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम (PMJVK) अंतर्गत जिल्हास्तरीय समितीकडून प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेऊन त्याची शिफारस केंद्र शासनास करणे.

समितीच्या बैठकीस उपरोक्त सदस्यांनी उपस्थित राहणे आवश्यक राहील.

सदर शासन पुरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०६१३१२१४५७७२१४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh M. Sonavane

Digitally signed by Dinesh M. Sonavane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9cabb099fd0576208f4caa310d2e7860201ab5363a2133e0927ff26c0f016fdf, 2.5.4.45=032100CD9D66225CED8BAE27E0E1249D39EC14A54419D0A13504B49333B23F92B58199, cn=Dinesh M. Sonavane
Date: 2019.06.13 12:04:48 +05'30'

(दि.मा.सोनवणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल याचे सचिव, राजभवन, मुंबई,

२) मा.मंत्री,अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार,

३) मा.मुखमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

५) मा.विरोधी पक्षनेता विधानभवन,मुंबई

६) मा.मंख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे सह सचिव,

७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव, मुंबई

८) सचिव,अल्पसंख्याक कार्य मंत्रालय,भारत सरकार,११ वा मजला,पर्यावरण भवन, सी.जी.ओ.कॉम्प्लेक्स,नवी दिल्ली-११०००३

९) श्री.राजीव शंकरराव सातव,लोकसभा सदस्य,मु.पो.कळमनुरी,हिगोली-४३१७०२

१०) श्री.सजय हरिभाऊ जाधव, लोकसभा सदस्य,कै.बाळासाहेब ठाकरे नगर, घर नं.१०,जिंतूर रोड,परभणी.

११) श्री.अमर शंकर सांबळे,राज्यसभा सदस्य, अनुशंकर,प्लॉट नं.४२६,सेक्टर २७,शहिद कोठारी बंधू मार्ग,आकुर्डी,पिंपरी चिंचवड,नवनगर प्राधिकरण, पुणे-४११०४४

१२) श्री.प्रतापराव गोविदराव पाटील-चिखलीकर,विधानसभा सदस्य,साई सुभाष वसंत नगर, जि.नादेड. पिन-४३१७४६

१३) श्री.महेश प्रभाकर चौघुले,विधानसभा सदस्य,रु.नं.२८५,ज्ञानेश्वर मंदिराजवळ, गौरीपाडा,ता.भिवंडी,जि.ठाणे.पिन-४२१३०२

१४) सर्व विभागीय आयुक्त,

१५) सर्व जिल्हाधिकारी,

१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,

१७) आयुक्त,एकात्मीकृत बालकल्याण आयोग,मुंबई,

१८) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,

१९) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२०) पोलीस आयुक्त,मुंबई

२१) सर्व पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधिक्षक

२२) सर्व महानगरपालिका आयुक्त,

२३) सर्व मुख्याधिकारी,नगरपालिका

२४) निवड नस्ती